# पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३ रा मजला, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे- ४११००१

पीबीएक्स- ०२०-२६१२६६२८/२६१२६७८५/२६११४०६४ फॅक्स- ०२०-२६१२७००४/२६१३२४०१

Email :- dirmktms@gmail.com website :- www.mahapanan.maharashtra.gov.in


जा.क्र.पणन-५/कृउबास/अनावश्यक बाब/खर्च कमी/करणे/२०/ ५०१३ दिनांक :- २४ डिसेंबर, २०२०

**वाचावे** :- महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे व त्याखालील नियम, १९६७ मधील तरतूदी.

**विषय :- कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी अनावश्यक बाबींवरील खर्च कमी करणेबाबत...**

**-: परिपत्रक :-**

सद्यस्थितीत राज्यात थेटपणन व खाजगी बाजार परवाना पध्दतीमुळे कृषि उत्पन्न बाजार समित्याकरीता निर्माण झालेली स्पर्धा तसेच कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे बाजार समित्यांच्या आवारामध्ये शेतमालाच्या आवकेवर परिणाम होऊन त्याचा बाजार समितीच्या उत्पन्नावर विपरीत परिणाम झालेला असल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे फळे व भाजीपाला शेतमालाचे बाबतचे नियमन रद्द करण्यात आलेले असल्याने बाजार समितीच्या उत्पन्नामध्ये काही प्रमाणात घट झालेली आहे.

२. कृषि उत्पन्न बाजार समितीच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत हा बाजार फी असून बाजार समित्यांना कोणत्याही प्रकारचे अर्थसहाय्य किंवा अनुदान शासनाकडुन मिळत नाही. बाजार फी च्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नातूनच कर्मचाऱ्यांचे पगार व इतर प्रशासकीय खर्च तसेच आवश्यकतेनुसार बाजार आवारात शेतकऱ्यांना मुलभूत व इतर पुरक सुविधा उलब्ध करून दिल्या जातात.

३. बाजार समित्यांनी शेतमाल खरेदी विक्री व्यवहारावरील नियंत्रणाच्या दृष्टीने बाजार आवारात सुविधा उपलब्ध करून देण्याकरीता महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ व इतर वित्तीय संस्था यांचेकडून वेळोवेळी मोठ्या प्रमाणावर कर्जे घेतलेली आहेत.

४. उपरोक्त पार्श्वभूमीवर बाजार समित्यांचे उत्पन्न कमी झालेले असल्याने, राज्यातील काही कृषि उत्पन्न बाजार समित्यांकडून महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे अंशदान व सुपरव्हीजन फी माफ करण्याबाबत सातत्याने मागणी होत आहे.

५. तथापि उपरोक्त परिस्थिती विचारात घेता, बाजार समित्यांनी डायरी व कॅलेंडर छपाई, वाढदिवसानिमित्त तसेच वर्धापन दिना निमित्त देण्यात येणाऱ्या वर्तमानपत्रातील, नभोवाणीतील तसेच दुरचित्रवाणी वरील जाहिराती, पोस्टर्स/ बॅनर्स, वाहन वापरावरील अनावश्‍यक खर्च, मिटींगच्या वेळी होणारा अनावश्यक खर्च, राजकीय सभा, संम्मेलने इ. कारणाकरीता करण्यात येणारा खर्च टाळल्यास बाजार समित्यांच्या खर्चात बचत होऊन सदरची रक्कम बाजार आवारातील पायाभूत विकासाकरीता वापरता येईल. तसेच बाजार समित्यांनी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे व त्याखालील नियम, १९६७ मधील तरतुदीस अधिन राहून बाजार फी व्यतिरिक्त इतर बाबी मधून बाजार समितीस उत्पन्न मिळेल यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे, जेणेकरून बाजार समितीच्या एकूण उत्पन्नात वाढ होईल.

६. या परिपत्रकाद्वारे सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांना सूचित करण्यात येते की, बाजार समित्याकडून उपरोक्त नमूद बाबींवर अनावश्यक खर्च होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. तथापि, उपरोक्त नमूद बाबींवर खर्च करणे आवश्यक असल्यास त्यास या कार्यालयाशी पूर्वपरवानगी घेण्यात यावी.

याबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी जिल्ह्यातील सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांवर नियंत्रण ठेवावे व सदर परिपत्रकीय सूचनांचे कोटेकोरपणे अंमलबजावणी होईल असे पहावे.

**(सतिश सोनी)**
**पणन संचालक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रत** :-
१. जिल्हा उपनिबंधक, सहकार संस्था, ------------- (सर्व)
२. सभापती/ सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, --------- (सर्व)